# सर्वांगीण विकासामध्ये शैक्षणिक धोरण महत्त्वाचे

## विकासचंद्र रस्तोगी: 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०' सहविचार सभा



**सभेच्या दुसऱ्या सत्रामध्ये विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांनी 'राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०' मध्ये विद्यापीठाची भूमिका यावर आपला अहवाल सादर केला. त्यानंतर विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एल. एम. वाघमारे, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. वसंत भोसले, मानव्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अजय टेंगसे, आंतर विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैयजंता पाटील यांनीही या धोरणावर त्यांचे विचार प्रकट करून सूचना दिल्या.**

**नांदेड, पुढारी वृत्तसेवा:** भारताच्या सर्वांगीण विकासामध्ये राष्ट्राचे शैक्षणिक धोरण महत्त्वाचे असणार आहे, असे मत महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी व्यक्त केले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील अधिसभा सभागृहामध्ये 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०'या विषयावर एकदिवसीय सहविचार सभेमध्ये ऑनलाईन मार्गदर्शन करताना ते बोलत होते. त्यांच्यासमवेत राज्याचे शिक्षण संचालक डॉ. धनराज माने हेही ऑनलाईन उपस्थित होते.

अधिसभा सभागृहामध्ये व्यासपीठावर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. एल. एम. वाघमारे, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. वसंत भोसले,मानव्यविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अजय टेंगसे, आंतर विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैयजंता पाटील उपस्थित होते.

यावेळी बोलताना रस्तोगी म्हणाले की, भारत स्वतंत्र होऊन ७५ वर्षे होत आहेत. २०४७ रोजी स्वातंत्र्याला शंभर वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यावेळी भारताची शैक्षणिक स्थिती काय राहील याचा विचार आजच आपल्याला करावा लागेल. २५ वर्षे अगोदर त्यावर अभ्यास करून त्याची परिपूर्ण अशी तयारी करावी लागेल. २५ वर्षानंतरच्या शिक्षणाची उपयोगिता उच्च दर्जाची राहण्यासाठी आपल्याला योग्य असे धोरण ठरवावे लागेल. त्यावेळी २५ ते ४०वयोगटातील तरुणांमध्ये विशेष कौशल्य किंवा उच्च स्तरातील प्रतिभा निर्माण करण्यासाठी हे शैक्षणिक धोरण महत्वाचे आहे.

या धोरणाच्या माध्यमातून आपला तरुण वर्ग बुद्धीमतेच्या जोरावर स्वतःचे राहणीमान आणि देशाची प्रतिभा उंचावण्यासाठी निश्चितच सक्षम असणार आहेत. भविष्यातील आपला तरुण वर्ग हा विशेष कौशल्यासहित आंतरविद्याशाखीय असणार आहे.

प्रत्येक दहा वर्षांनी तो आपले ज्ञान अद्ययावत करीत राहणार आहे. आवश्यक ते तंत्रज्ञान अवगत करणार आहे. या सर्व बाबतीत सर्वात महत्त्वाची भूमिका आहे ती शिक्षकांची. विद्यार्थ्यांना घडविण्यांच्या आधी शिक्षकांनी स्वतःला अद्ययावत ठेवणे खूप महत्त्वाचे आहे.

इतर देशाच्या तुलनेत आपले सकल नोंदणी प्रमाण हा खूप कमी आहे. या 'राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०' द्वारे यामध्ये निश्चितच वाढ होणार आहे. आजही जगातल्या १०० विद्यापीठांमध्ये भारतातील एकही विद्यापीठ नाही. भारतातील टॉपच्या १०० विद्यापीठांमध्ये महाराष्ट्रातील फक्त सात विद्यापीठे आहेत. ही परिस्थिती आपल्याला बदलावयाची आहे. यासाठी महाराष्ट्रातल्या सर्व विद्यापीठांनी या राष्ट्रीय शिक्षण धोरणाला अधिक मजबूत करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन या सहविचार सभेमध्ये त्यांनी उपस्थितांना केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. योगिनी सातारकर यांनी केले.

दै पुढारी दि.25/06/2022 Page.-4

# विद्यापीठांनी राष्ट्रीय शिक्षण धोरणाला सहकार्य करावे

## विकास चंद्र रस्तोगी यांचे आवाहन, एक दिवसीय सहविचार सभेमध्ये ऑनलाईन मार्गदर्शन

नांदेड, दि. २४ (प्रतिनिधी)- आजही जगातल्या १०० विद्यापीठांमध्ये हिंदुस्थानातील एकही विद्यापीठ नाही. हिंदुस्थानातील टॉपच्या १०० विद्यापीठांमध्ये महाराष्ट्रातील फक्त सात विद्यापीठे आहेत. ही परिस्थिती आपल्याला बदलायची आहे. यासाठी महाराष्ट्रातल्या सर्व विद्यापीठांनी राष्ट्रीय शिक्षण धोरणाला अधिक मजबूत करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी यांनी केले.

२३ जून रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील अधिसभा सभागृहामध्ये 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०'या विषयावर एक दिवसीय सहविचार सभेमध्ये ऑनलाईन मार्गदर्शन करताना ते बोलत होते. त्यांच्यासमवेत राज्याचे शिक्षण संचालक डॉ. धनराज माने हेही ऑनलाईन उपस्थित होते. अधिसभा सभागृहामध्ये व्यासपीठावर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ.एल. एम. वाघमारे, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. वसंत भोसले, मानव्यविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अजय टेंगसे, डॉ. वैयजंता पाटील उपस्थित होते.

रस्तोगी पुढे ते म्हणाले भविष्यातील आपला तरुण वर्ग हा विशेष कौशल्यासहित आंतरविद्याशाखीय असणार आहे. प्रत्येक दहा वर्षांनी तो आपले ज्ञान अद्यावत करीत राहणार आहे. आवश्यक ते तंत्रज्ञान अवगत करणार आहे. या सर्व बाबतीत सर्वात महत्त्वाची भूमिका आहे ती शिक्षकांची. विद्यार्थ्यांना घडविण्याच्या आधी शिक्षकांनी स्वतःला अद्ययावत ठेवणे खूप महत्त्वाचे आहे. इतर देशांच्या तुलनेत आपला सकल नोंदणी प्रमाण खूप कमी आहे. या 'राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०'द्वारे यामध्ये निश्चितच वाढ होणार आहे. सभेच्या दुसऱ्या सत्रामध्ये विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांनी 'राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०' मध्ये विद्यापीठाची भूमिका यावर आपला अहवाल सादर केला. त्यानंतर विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एल.एम. वाघमारे, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. वसंत भोसले, मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. अजय टेंगसे, आंतरविद्या शाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैयजंता पाटील यांनीही या धोरणावर त्यांचे विचार मांडून सूचना दिल्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. योगिनी सातारकर यांनी केले. या सहविचार सभेसाठी व्यवस्थापन परिषद सदस्य, अधिसभा सदस्य, विद्या परिषद सदस्य, संकुलाचे संचालक, प्राध्यापक व अधिकारी उपस्थित होते.

दै. सामना दि. 25/06/2022 Page. - 3

# भारताच्या सर्वांगीण विकासामध्ये राष्ट्राचे शैक्षणिक धोरण महत्त्वाचे राहणार

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०' सहविचार सभेमध्ये प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी यांचे प्रतिपादन

नांदेड/प्रतिनिधी

भारताला स्वतंत्र होऊन ७५ वर्षे होत आहेत.२०४७ रोजी स्वातंत्र्याला शंभर वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यावेळी भारताची शैक्षणिक स्थिती काय राहील याचा विचार आजच आपल्याला करावा लागेल. २५ वर्षे अगोदर त्यावर अभ्यास करून त्याची परिपूर्ण अशी तयारी करावी लागेल.२५ वर्षानंतरच्या शिक्षणाची उपयोगिता उच्च दर्जाची राहण्यासाठी आपल्याला योग्य असे धोरण ठरवावे लागेल. त्यावेळी २५ ते ४०वयोगटातील तरुणांमध्ये विशेष कौशल्य किंवा उच्च स्तरातील प्रतिभा निर्माण करण्यासाठी हे शैक्षणिक धोरण महत्वाचे आहे. या धोरणाच्या माध्यमातून आपला तरुण वर्ग बुद्धीमतेच्या जोरावर स्वतःचे राहणीमान आणि देशाची प्रतिभा उंचावण्यासाठी निश्चितच सक्षम असणार आहेत. त्यामुळे भारताच्या सर्वांगीण विकासामध्ये राष्ट्राचे शैक्षणिक धोरण महत्त्वाचे असणार आहे. असे मत महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी यांनी व्यक्त केले.

ते आज गुरूवार दि.२३ जून रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील अधिसभा सभागृहामध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०'या विषयावर एक दिवसीय सहविचार सभेमध्ये ऑनलाईन मार्गदर्शन करत होते. त्यांच्यासमवेत राज्याचे शिक्षण संचालक डॉ. धनराज माने हेही ऑनलाईन उपस्थित होते. तर अधिसभा सभागृहामध्ये व्यासपीठावर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. उद्धव भोसले, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. एल. एम. वाघमारे, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. वसंत भोसले, मानव्यविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अजय टेंगसे, आंतर विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैयजंता पाटील उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले भविष्यातील आपला तरुण वर्ग .हा विशेष कौशल्यासहित आंतरविद्याशाखीय असणार आहे. प्रत्येक दहा वर्षांनी तो आपले ज्ञान अद्यावत करीत राहणार आहे. आवश्यक ते तंत्रज्ञान अवगत करणार आहे. या सर्व बाबतीत सर्वांत महत्त्वाची भूमिका आहे ती शिक्षकांची. विद्यार्थ्यांना घडविण्याच्या आधी शिक्षकांनी स्वतःला अद्यावत ठेवणे खूप महत्वाचे आहे. इतर देशाच्या तुलनेत आपला सकल नोंदणी प्रमाण हा खूप कमी आहे. या राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०' द्वारे यामध्ये निश्चितच वाढ होणार आहे. आजही जगातल्या १०० विद्यापीठांमध्ये भारतातील एकही विद्यापीठ नाही भारतातील टॉपच्या १०० विद्यापीठामध्ये महाराष्ट्रातील फक्त सात विद्यापीठे आहेत. ही परिस्थिती आपल्याला बदलावयाची आहे. यासाठी महाराष्ट्रातल्या सर्व विद्यापीठांनी या राष्ट्रीय शिक्षण धोरणाला अधिक मजबूत करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन या सहविचार सभेमध्ये त्यांनी उपस्थितांना केले.

सभेच्या दुसऱ्या सत्रामध्ये विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. उद्धव भोसले यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०' मध्ये विद्यापीठाची भूमिका यावर आपला अहवाल सादर केला. त्यानंतर विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एल.एम. वाघमारे, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. वसंत भोसले,मानव्यविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अजय टेंगसे, आंतर विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैयजंता पाटील यांनीही या धोरणावर त्यांचे विचार प्रकट करून सूचना दिल्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. योगिनी सातारकर यांनी केले. या सहविचार सभेसाठी व्यवस्थापन परिषद सदस्य, अधिसभा सदस्य, विद्या परिषद सदस्य, संकुलाचे संचालक, प्राध्यापक व अधिकारी उपस्थित होते. या सभेच्या यशस्वीतेसाठी शैक्षणिक नियोजन व विकास विभागाच्या सहा. कुलसचिव डॉ. सरिता यन्नावार, संजय गाजे, तुकाराम पुरके, मोहन भिंडे, जया देशमुख, कविता गुरपाळकर, चंद्रकला हनवते, बाबाराव हंबर्डे, बालाजी शिंदे, बादलसिंग पुजारी, तिरुपती हंबर्डे यांनी परिश्रम घेतले.

दै. मराठवाडा नेता दि.24.06.22 page.4

# भारताच्या सर्वांगीण विकासामध्ये राष्ट्राचे शैक्षणिक धोरण महत्त्वाचे -रस्तोगी

**नांदेड-** भारताला स्वतंत्र होऊन ७५ वर्षे होत आहेत. २०४७ रोजी स्वातंत्र्याला शंभर वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यावेळी भारताची शैक्षणिक स्थिती काय राहील याचा विचार आजच आपल्याला करावा लागेल. २५ वर्षे अगोदर त्यावर अभ्यास करून त्याची परिपूर्ण अशी तयारी करावी लागेल. २५ वर्षानंतरच्या शिक्षणाची उपयोगिता उच्च दर्जाची राहण्यासाठी आपल्याला योग्य असे धोरण ठरवावे लागेल. त्यावेळी २५ ते ४० वयोगटातील तरुणांमध्ये विशेष कौशल्य किंवा उच्च स्तरातील प्रतिभा निर्माण करण्यासाठी हे शैक्षणिक धोरण महत्वाचे आहे. या धोरणाच्या माध्यमातून आपला तरुण वर्ग बुद्धीमतेच्या जोरावर स्वतःचे राहणीमान आणि देशाची प्रतिभा उंचावण्यासाठी निश्चितच सक्षम असणार आहेत. त्यामुळे भारताच्या सर्वांगीण विकासामध्ये राष्ट्राचे शैक्षणिक धोरण महत्त्वाचे असणार आहे, असे मत महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी व्यक्त केले.

ते गुरुवार दि.२३ जून रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील अधिसभा सभागृहामध्ये 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०'या विषयावर एक दिवसीय सहविचार सभेमध्ये ऑनलाईन मार्गदर्शन करत होते. त्यांच्यासमवेत राज्याचे शिक्षण संचालक डॉ. धनराज माने हेही ऑनलाईन उपस्थित होते. तर अधिसभा सभागृहामध्ये व्यासपीठावर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. एल. एम. वाघमारे, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. वसंत भोसले, मानव्यविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अजय टेंगसे, आंतर विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैयजंता पाटील उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले भविष्यातील आपला तरुण वर्ग हा विशेष कौशल्यासहित आंतरविद्याशाखीय असणार आहे. प्रत्येक दहा वर्षांनी तो आपले ज्ञान अद्यावत करीत राहणार आहे. आवश्यक ते तंत्रज्ञान अवगत करणार आहे. या सर्व बाबतीत सर्वात महत्त्वाची भूमिका आहे ती शिक्षकांची. विद्यार्थ्यांना घडविण्याच्या आधी शिक्षकांनी स्वतःला अद्यावत ठेवणे खूप महत्वाचे आहे. महाराष्ट्रातल्या सर्व विद्यापीठांनी या राष्ट्रीय शिक्षण धोरणाला अधिक मजबूत करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन या सहविचार सभेमध्ये त्यांनी उपस्थितांना केले.

सभेच्या दुसऱ्या सत्रामध्ये विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांनी 'राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०' मध्ये विद्यापीठाची भूमिका यावर आपला अहवाल सादर केला. त्यानंतर विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एल. एम. वाघमारे, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. वसंत भोसले, मानव्यविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अजय टेंगसे, आंतर विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैयजंता पाटील यांनीही या धोरणावर त्यांचे विचार प्रकट करून सूचना दिल्या.

दै. गोदातीर समाचार दि. 24.06.22 Pag-6

# भारताच्या सर्वांगिण विकासात राष्ट्राचे शैक्षणिक धोरण महत्त्वाचे राहणार -रस्तोगी

नांदेड, दि. २३ : भारताला स्वतंत्र मिळून ७५ वर्षे होत आहेत. २०४७ रोजी स्वातंत्र्याला शंभर वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यावेळी भारताची शैक्षणिक स्थिती काय राहील याचा विचार आजच आपल्याला करावा लागेल. २५ वर्षे अगोदर त्यावर अभ्यास करून त्याची परिपूर्ण अशी तयारी करावी लागेल. २५ वर्षानंतरच्या शिक्षणाची उपयोगिता उच्च दर्जाची राहण्यासाठी आपल्याला योग्य असे धोरण ठरवावे लागेल. त्यावेळी २५ ते ४०वयोगटातील तरुणांमध्ये विशेष कौशल्य किंवा उच्च स्तरातील प्रतिभा निर्माण करण्यासाठी हे शैक्षणिक धोरण महत्वाचे आहे. या धोरणाच्या माध्यमातून आपला तरुण वर्ग बुद्धीमतेच्या जोरावर स्वतःचे राहणीमान आणि देशाची प्रतिमा उंचावण्यासाठी निश्चितच सक्षम असणार आहेत. त्यामुळे भारताच्या सर्वांगीण विकासामध्ये राष्ट्राचे शैक्षणिक धोरण महत्वाचे असणार आहे. असे मत महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी व्यक्त केले.

गुरुवार दि. २३ जून रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील अधिसभा सभागृहामध्ये 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०'या विषयावर एक दिवसीय सहविचार सभेमध्ये ते ऑनलाईन मार्गदर्शन करत होते. त्यांच्यासमवेत राज्याचे शिक्षण संचालक डॉ. धनराज माने हेही ऑनलाईन उपस्थित होते. तर अधिसभा सभागृहामध्ये व्यासपीठावर कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, डॉ. एल. एम. वाघमारे, डॉ. वसंत भोसले, डॉ. अजय टेंगसे, डॉ. वैयजंता पाटील उपस्थित होते.

सभेच्या दुसऱ्या सत्रात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांनी 'राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०' मध्ये विद्यापीठाची भूमिका यावर आपला अहवाल सादर केला. डॉ. एल. एम. वाघमारे, डॉ. वसंत भोसले, डॉ. अजय टेंगसे, डॉ. वैयजंता पाटील यांनीही या धोरणावर त्यांचे विचार प्रकट करून सूचना दिल्या.

दै. प्रजावाणी दि. 24.6.22 Page :- 3

FRIDAY | 24 JUNE 2022 lokmat Times
AURANGABAD

Lokmat Times
www.epaper.lokmat.com/lokmattimes/

There is no shortcut to success, students told

# 'NEP is key to overall development of India'

LOKMAT NEWS NETWORK
NANDED, JUNE 23

A one-day symposium on 'National Education Policy (NEP) 2020' was organised by the Swami Ramananda Teerth Marathwada University, on Thursday. Principal Secretary, Department of Higher and Technical Education, State of Maharashtra Vikas Chandra Rastogi, expressed his views about the policy.

"It has been 75 years since India became independent. Today, we have to think about the educational status of India. We have to study it 25 years in advance and prepare it thoroughly. Right now, this education policy is important to create special skills or high level of talent in the youth in the age group of 25-40 years. Through this policy, our youths will definitely be able to raise their own standard of living and take the country forward towards more advancement. Therefore, this education policy of the nation will be important in the overall development of India," added Rastogi.



A one-day symposium on 'National Education Policy 2020' organised by the Swami Ramananda Teerth Marathwada University, is underway in Nanded on Thursday.

State's director of education Dr Dhanraj Mane was also present online with Rastogi. Vice Chancellor of the University Dr Udhav Bhosle, Dr LM Waghmare, Dr Vasant Bhosale, Dr Ajay Tengse and Vaijanta Patil were also present on the occasion.

Rastogi pointed out that the Gross Enrollment Ratio (GER) of the country is very low compared to other countries. "This will definitely increase through the 'National Education Policy-2020'. There are only seven universities in Maharashtra in the top 100 universities in India." He appealed all universities to cooperate to strengthen the NEP.

# भारत के समग्र विकास में शिक्षा नीति होगी महत्वपूर्ण

## • राष्ट्रीय शिक्षा नीति सहविचार सभा में बोले प्रमुख सचिव रस्तोगी

जिला संवाददाता | नांदेड़



भारत को स्वतंत्र हुए 75 वर्ष हो चुके हैं। 2047 स्वतंत्रता की शताब्दी का प्रतीक होगा। आज हमें उस समय भारत की शैक्षिक स्थिति के बारे में सोचना होगा। आपको 25 साल पहले इसका अध्ययन करना होगा और इसे पूरी तरह से तैयार करना होगा। हमें 25 साल बाद शिक्षा की उपयोगिता को ऊंचा रखने के लिए सही नीति तय करनी है। उस समय 25 से 40 वर्ष की आयु के युवाओं में विशेष कौशल या उच्च स्तर की प्रतिभा पैदा करने के लिए यह शैक्षिक नीति महत्वपूर्ण है। इस नीति के माध्यम से हमारा युवा वर्ग निश्चित रूप से अपने स्वयं के जीवनस्तर और देश की प्रतिभा को बुद्धि के बल पर ऊपर उठाने में सक्षम होगा। अतः यही राष्ट्र की शिक्षा नीति भारत के समग्र विकास में महत्वपूर्ण होगी। यह प्रतिपादन राज्य के प्रमुख सचिव, उच्च और तकनीकी शिक्षा विभाग के विकास चंद्र रस्तोगी ने किया।

वे गुरुवार को स्वामी रामानंद तीर्थ मराठवाड़ा विश्वविद्यालय के सभा कक्ष में 'राष्ट्रीय शिक्षा नीति 2020' पर एक दिवसीय संगोष्ठी में ऑनलाइन मार्गदर्शन कर रहे थे। उनके साथ राज्य के शिक्षा निदेशक डॉ. धनराज माने भी ऑनलाइन मौजूद थे। कार्यक्रम में कुलपति डॉ. उद्धव भोसले, विज्ञान एवं प्रौद्योगिकी विभाग के प्रमुख डॉ. एलएम वाघमारे, वाणिज्य और प्रबंधन संकाय के डीन डॉ. वसंत भोसले, मानविकी संकाय के डीन डॉ. अजय टेंगसे, इंटरडिसिप्लिनरी ब्रांच के डीन डॉ. वैजंता पाटील उपस्थित थे।

### नामांकन अनुपात बहुत कम

उन्होंने कहा कि भविष्य में हमारा युवा वर्ग विशेष कौशल के साथ अंतःविषय होगा। वह हर दस साल में अपने ज्ञान को अध्ययन करना जारी रखेगा। जरूरी तकनीक की जानकारी होगी। इन सभी मामलों में सबसे महत्वपूर्ण भूमिका शिक्षकों द्वारा निभाई जाती है। छात्रों को बनाने से पहले शिक्षकों के लिए खुद को अपडेट रखना बहुत जरूरी है। हमारा सकल नामांकन अनुपात (जीईआर) अन्य देशों की तुलना में बहुत कम है। यह निश्चित रूप से राष्ट्रीय शिक्षा नीति के माध्यम से बढ़ेगा। आज भी दुनिया के 100 विश्वविद्यालयों में भारत में कोई विश्वविद्यालय नहीं है। महाराष्ट्र में केवल सात विश्वविद्यालय भारत के शीर्ष 100 विश्वविद्यालयों में हैं। हमें इस स्थिति को बदलने की जरूरत है। इसके लिए महाराष्ट्र के सभी विश्वविद्यालयों को राष्ट्रीय शिक्षा नीति को मजबूत करने में सहयोग करना चाहिए।

जून

दै. भास्कर दि. 24.06.2022 page.-16

सहविचार सभा

प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांचे प्रतिपादन दै. एकमत दि.24.06.2022 P.No 8

# भारताच्या विकासात राष्ट्राचे शैक्षणिक धोरण महत्त्वाचे



नांदेड : प्रतिनिधी

भारताला स्वतंत्र होऊन ७५ वर्षे होत आहेत. २०४७ रोजी स्वातंत्र्याला शंभर वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यावेळी भारताची शैक्षणिक स्थिती काय राहील याचा विचार आजच आपल्याला करावा लागेल. २५ वर्षे अगोदर त्यावर अभ्यास करून त्याची परिपूर्ण अशी तयारी करावी लागेल.२५ वर्षानंतरच्या शिक्षणाची उपयोगिता उच्च दर्जाची राहण्यासाठी आपल्याला योग्य असे धोरण ठरवावे लागेल. त्यावेळी २५ ते ४० वयोगटातील तरुणांमध्ये विशेष कौशल्य किंवा उच्च स्तरातील प्रतिभा निर्माण करण्यासाठी हे शैक्षणिक धोरण महत्वाचे आहे. या धोरणाच्या माध्यमातून आपला तरुण वर्ग बुद्धीमतेच्या जोरावर स्वतःचे राहणीमान आणि देशाची प्रतिभा उंचावण्यासाठी निश्चितच सक्षम असणार आहेत. त्यामुळे भारताच्या सर्वांगीण विकासामध्ये राष्ट्राचे शैक्षणिक धोरण महत्त्वाचे असणार आहे. असे मत महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी व्यक्त केले.

दि.२३ जून रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील अधिसभा सभागृहामध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० या विषयावर एक दिवसीय सहविचार सभेमध्ये ऑनलाईन मार्गदर्शन करत होते. त्यांच्यासमवेत राज्याचे शिक्षण संचालक डॉ. धनराज माने हेही ऑनलाईन उपस्थित होते. तर अधिसभा सभागृहामध्ये व्यासपीठावर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. एल. एम. वाघमारे, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. वसंत भोसले,मानव्यविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अजय टेंगसे, आंतर विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैयजंता पाटील उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले भविष्यातील आपला तरुण वर्ग हा विशेष कौशल्यासहित आंतरविद्याशाखीय असणार आहे. प्रत्येक दहा वर्षांनी तो आपले ज्ञान अद्यावत करीत राहणार आहे. आवश्यक ते तंत्रज्ञान अवगत करणार आहे. या सर्व बाबतीत सर्वात महत्त्वाची भूमिका आहे ती शिक्षकांची. विद्यार्थ्यांना घडविण्याच्या आधी शिक्षकांनी स्वतःला अद्यावत ठेवणे खूप महत्वाचे आहे. इतर देशाच्या तुलनेत आपला सकल नोंदणी प्रमाण हा खूप कमी आहे. या द्वाराष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० द्वारे यामध्ये निश्चितच वाढ होणार आहे. आजही जगातल्या १०० विद्यापीठांमध्ये भारतातील एकही विद्यापीठ नाही भारतातील टॉपच्या १०० विद्यापीठामध्ये महाराष्ट्रातील फक्त सात विद्यापीठे आहेत. ही परिस्थिती आपल्याला बदलावयाची आहे. यासाठी महाराष्ट्रातल्या सर्व विद्यापीठांनी या राष्ट्रीय शिक्षण धोरणाला अधिक मजबूत करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन या सहविचार सभेमध्ये त्यांनी उपस्थितांना केले.

सभेच्या दुसऱ्या सत्रामध्ये विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० मध्ये विद्यापीठाची भूमिका यावर आपला अहवाल सादर केला. त्यानंतर विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एल.एम. वाघमारे, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. वसंत भोसले,मानव्यविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अजय टेंगसे, आंतर विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैयजंता पाटील यांनीही या धोरणावर त्यांचे विचार प्रकट करून सूचना दिल्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. योगिनी सातारकर यांनी केले. या सहविचार सभेसाठी व्यवस्थापन परिषद सदस्य, अधिसभा सदस्य, विद्या परिषद सदस्य, संकुलाचे संचालक, प्राध्यापक व अधिकारी उपस्थित होते. या सभेच्या यशस्वीतेसाठी शैक्षणिक नियोजन व विकास विभागाच्या सहा. कुलसचिव डॉ. सरिता यन्नावर, संजय गाजरे, तुकाराम भुरके, मोहन किरडे, जया देशमुख, कविता गुरपाळकर, चंद्रकला हनवते, बाबाराव हंबर्डे, बालाजी शिंदे, बादलसिंग पुजारी, तिरुपती हंबर्डे यांनी परिश्रम घेतले.